पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,
पहिला मजला, चिंचवड पुणे ३३

जावक क्रमांक /सपोआ/वाहतूक/प्रेसनोट/ /२०२३, पिंपरी चिंचवड दि. ०१/०६/२०२३

## प्रे स नो ट

## वाहतुक शाखा,पिंपरी-चिंचवड येथील पोलीस अधिकारी/अंमलदार तसेच ट्राफिक वार्डन यांचे करीता मेंटल वेलनेस प्रोगाम आयोजित केले बाबत

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय अंतर्गत वेगवेगळया वाहतुक विभागामधील महत्वाचे चौकात विशेषतः गर्दीचे ठिकाणी व महत्वाच्या चौकांमध्ये पोलीस अधिकारी/अंमलदार तसेच ट्राफिक वार्डन हे दैनंदिन कर्तव्य बजावीत असतात. त्यावेळी वाहतूक अधिनियमाचे उल्लंघन करणारे वाहन चालक यांचेविरुध्द विविध हेडखाली कायद्यान्वये कार्यवाही करीत असतात. अशावेळी वहूतक वाहन चालक हे कर्तव्यावरील पोलीस अधिकारी/अंमलदार तसेच ट्राफिक वार्डन यांचे सोबत वाद घालून हुज्जत करीत असतात. कधीकधी असभ्य बोलून किंवा असभ्य वर्तन करुन त्यांचेसोबत अरेरावीने वागत असतात. अशा प्रकारच्या रोजच्या घटनेमुळे त्यांची मानसीकता बदलून ते ताणतणावात कर्तव्य करीत असतात. तसेच काही पोलीस अधिकारी/अंमलदार तसेच ट्राफिक वार्डन यांना घरघुती/वैय्यक्तीक अडचणी मुळे सुध्दा ते ताणतणावात असतात. यामुळे पोलीस अधिकारी/अंमलदार तसेच ट्राफिक वार्डन हे त्यांचे दैनंदिन कर्तव्यात वाहतुक अधिनियमाचे उल्लंघन करणारे वाहन चालक यांचेविरुध्द विविध हेडखाली कायद्यान्वये कार्यवाही करीत असताना वाहन चालक हे कर्तव्यावरील पोलीस अधिकारी/अंमलदार तसेच ट्राफिक वार्डन यांचे सोबत वाद घालून हुज्जत करीत असतात. यातून पोलीस अधिकारी/अंमलदार तसेच ट्राफिक वार्डन यांचे मानसीक संतूलन गेल्याने त्यांचेमध्ये वाद होऊन भांडणे होतात. तसेच यातूनच ३५३ भादवि चे गुन्हे दाखल होतात. अशा प्रकारे पोलीस अधिकारी/अंमलदार तसेच ट्राफिक वार्डन यांना मानसीक संतूलन कसे टिकवावे, वाद घालणारे वाहन चालक यांना कसे हाताळावे याबाबत एस पॉवर, आदित्य बिरला एज्युकेशन ट्रस्ट वाकड पुणे यांच्या मार्फतीने मानसोपचार तज्ञ यांचे वतीने मेंटल वेलनेस प्रोग्रामचे आयोजन दि.३१/०५/२०२३ रोजी १३.०० ते १४.०० वा. दरम्यान करण्यात आले. सदर मेंटल वेलनेस प्रोग्रामचे माध्यमातून पोलीस अधिकारी/अंमलदार तसेच ट्राफिक वार्डन यांना विविध प्रकारचे ताणतणाव बाबत तसेच त्यातून आपण कसे वागावे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. सदर प्रोग्रामचे शेवटी उपस्थित सर्व पोलीस अधिकारी/अंमलदार तसेच ट्राफिक वार्डन यांनी सदर मेंटल वेलनेस प्रोग्राम बाबत समाधान व्यक्त करुन त्यांचे दैनंदिन कर्तव्यात यामुळे बदल होऊन त्यांना मानसीक संतूलन टेवण्यात उपयुक्त होणार आहे. अशी प्रतिक्रिया दिली आहे.

सदरचे मेंटल वेलनेस प्रोग्राम आयोजित करण्याकरीता मा.पोलीस आयुक्त श्री. विनय कुमार चौबे, मा. सह पोलीस आयुक्त, श्री. संजय शिंदे, मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ १, श्री. विवेक पाटील, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. विठ्ठल कुबडे, यांचे मार्गदर्शनाखाली, मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अजय जोगदंड चिंचवड वाहतुक शाखा, मोहम्मद अन्सारी सिनिअर मॅनेजर बिरला हॉस्पीटल, श्रीमती भविथा थॉमस (सायकॉलॉजीस्ट), श्रीमती शिल्पा जगताप मॅडम, श्री महादेव जगताप एसकेएफ कंपनी यांनी यशस्वी केला आहे.

Kubade 1/6/2023

(विठ्ठल कुबडे)
सहायक पोलीस आयुक्त
वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड

प्रत : सर्व संबंधीतांना

Scanned with CamScanner